**सं. फौ. ख. क्र.५७५/२०२३**

सरकार वि. इम्रान कुरेशी

**नि.क्र.१६**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

**<u>माझे नाव– किसन सुरेश बेलदार ,</u>**

वय–४३ वर्षे, नेमणूक– पो.हवा.११९६/ वालचंदनगर पो.स्टे.,

रा.वालचंदनगर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. पी. कुचेकर, यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

दि.११/०९/२०२२ रोजी मी वालचंदनगर पोलीस स्टेशन येथे वाहन चालक या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी मी रात्री गस्तीला कर्तव्यावर होतो. माझ्यासोबत पी.एस.आय.टेळकीकर, दोन होमगार्ड होते. ११ तारखेला पहाटे ३ वाजता गस्ती घालत असताना पी.एस.आय.टेळकीकर यांना फोन आला की, दोन गायी व १४ वासरे ही लासुर्णे येथील राजवाडयाशेजारी आणून ठेवली आहेत. त्यानंतर आम्ही लगेच लासुर्णेला निघालो. तेथे जावून पाहिले असता तेथे एका टेम्पोमध्ये दोन गायी होत्या व घरासमोर चौदा वासरे होती. तेथे विचारपूस केली असता गायी व वासरे इम्रान कुरेशी यांची असल्याचे समजले. आम्ही आरोपीला उठवून त्याची विचारपूस केली. परंतू त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. जनावरांना कोणतेही खायला दिलेले नव्हते. त्यानंतर मी जावून पोलीस स्टेशनला फिर्याद दिला. आता मला मी दिलेली फिर्याद दाखविली. त्यावरील सही माझीच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. **<u>फिर्यादीस नि.क्र.१७</u>** देण्यात येते. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे. त्यानंतर मी तपासी अंमलदार खाडे यांना घटनास्थळ दाखविले.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. एम. पी. लोंढे, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही धाड टाकली त्यावेळी तेथे अंधार होता. त्या दिवशी आम्ही अंथुर्णे गावातच होतो. अंथुर्णे ते वालचंदनगर पोलीस स्टेशन ४ कि.मी. अंतर आहे. अंथुर्णेवरून आम्ही सरळ लासुर्णे येथे गेलो. वालचंदनगर ते लासुर्णे एक कि.मी. अंतर आहे. हे म्हणणे खरे नाही की, २०२२ मध्ये लासुर्णे ते जंक्शन हे पालखी महामार्गाचे काम

चालू होते. २.३० वाजता खबर मिळाली. दि.११/०९/२०२२ रोजी मी लासुर्णे येथेच होतो. वालचंदनगर येथे मी चार वर्षे झाले काम करतो. वालचंदनगर परिसराची मला माहिती आहे. वालचंदनगर परिसरात ब–याच जणांचे गार्यींचे गोठे आहेत का? मला माहिती नाही. वालचंदनगर पोलीस स्टेशनचे बांधकाम २०२२ मध्ये झाले नाही. वालचंदनगर पोलीस स्टेशनचे बांधकाम शेती महामंडळाच्या जागेवर झाले आहे का कसे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वालचंदनगर पोलीस स्टेशनच्या समोर मोहोळकर यांची डेअरी आहे. जंक्शन चौकात म्हैशींचा गोठा आहे. गोठयातील म्हैशी या वालचंदनगर पोलीस स्टेशन समोरूनच शेती महामंडळाच्या शेतात चरायला जातात. आनंदनगर भागातून बरेच शेतकरी त्यांची गुरे शेती महामंडळाच्या जागेत चरायला आणतात. बारामती येथे गुरांचा मोठा बाजार आहे. तो बाजार गुरुवारी असतो. इंदापूर भागातून बरेच शेतकरी गुरांच्या बाजारात गायी विकण्यासाठी जातात. नऊदारे वस्तीवरून देखील जनावरांच्या बाजारात जनावरे नेहली जातात. वाहने बाजारात नेणा–या प्रत्येक वाहनाची नोंद आमच्या पोलीस स्टेशनला नाही. टेम्पो हा जागेवरच उभा होता. हे म्हणणे खरे नाही की, १४ वासरे ही गोठयात होती. साक्षीदार सांगतो की, मोकळया जागेत कम्पाऊंडमध्ये होती. आरोपीच्या घराशेजारी अनेक जनावरांचे गोठे आहेत. मला वैयक्तीक खबर मिळाली नाही. मी जनावरांची डॉक्टरांकडून वैद्यकीय तपासणी करून घेतली नाही. पहाटे ४.३० ते ५.०० वाजेपर्यंत मी घटनास्थळावर होतो. जनावरे पोलीस स्टेशनला नेहली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर कोणतीही जनावरे मिळून आली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कधीही जनावरे बाळगली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, कोटा पुर्ण करण्यासाठी खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, जनावरांना कोणतेही खायला दिलेले नव्हते हे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

**( ए. बी. पाटील)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.१४/११/२०२५**